पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☏: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 1038
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक : 16/07/2022
Date :

# परिपत्रक क्रमांक 52

संदर्भ : - १) परिपत्रक क्र.१०७, संदर्भ क्र. पुअहोसोविसो/परीक्षा /२०१९-२०/२३१४, दिनांक ४/११/२०१९
२) परिपत्रक क्र.२४, संदर्भ क्र. पुअहोसोविसो/परीक्षा/वेळापत्रक/२०१९-२०/२९, दिनांक ७/१/२०२१

प्रस्तुत विद्यापीठाकडून संदर्भ क्रमांक १ येथील परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/ विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना पाठवून सर्व प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण हे परीक्षा संपल्यानंतर दोन दिवसात ज्या त्या महाविद्यालयाच्या प्राचार्य/संकुलाचे संचालक यांना दिलेल्या Login मधून Entry करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर संदर्भ क्रमांक २ येथील परिपत्रकान्वये संबंधित विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण अपलोड झाल्याशिवाय निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया पुर्ण होऊ शकत नाही. असे कळविण्यात आले होते.

वरीलप्रमाणे प्रस्तुत विद्यापीठाकडून अंतर्गत गुण / प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणासंदर्भात वारंवार सूचना देऊन देखील बऱ्याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण / प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण विहित वेळेमध्ये Login मधून Entry करण्यात आली नसल्याची बाब विद्यापीठाच्या निदर्शनास सातत्याने येत आहे. त्यामुळे अंतर्गत गुण / प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणामुळे निकाल प्रसिध्द करण्यास देखील विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाच्या सर्व प्राचार्य/ संकुलाचे संचालक यांना पुनःश्च कळविणेत येते की, आपल्या महाविद्यालयातील /संकुलातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सत्रनिहाय परीक्षा संपण्यापुर्वी दोन दिवस अगोदर अंतर्गत गुण/ प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण आपणास लॉगीनमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या लिंकव्दारे विद्यापीठाकडे सादर करण्याची योग्यती दक्षता घेण्यात यावी.

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाकडून अंतर्गत गुण / प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण प्रस्तुत विद्यापीठास पाठविण्यात आले आहेत त्या गुणाच्या अभिलेखाबाबत संदर्भ क्रमांक १ येथील परिपत्रकानुसार कळविण्यात आले आहे . त्यानुसार सर्व महाविद्यालयाने कार्यवाही करावी. त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी ही ज्या त्या महाविद्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

सबब, वरीलप्रमाणे कळविण्यात आल्यानुसार सदरील परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर दोन दिवसाच्या आत सर्व महाविद्यालयांनी/ संकुलाच्या संचालकांनी अंतर्गत गुण /प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण Login मधून Entry करुन प्रस्तुत विद्यापीठास पाठवून विद्यापीठास परीक्षेच्या कामामध्ये सहकार्य करावे.

( डॉ. शिवकुमार एस. गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१) प्राचार्य/प्राचार्या, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये, सर्व संकुलाचे संचालक, प्रस्तुत विद्यापीठ
२) ,प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागातील संगणक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ